# शिव - भाग २

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. शिवाची वैशिष्ट्ये | ६ |
| २. शिवाची रूपे | १४ |
| ३. मूर्तीविज्ञान | १८ |
| ४. संप्रदाय | १८ |
| ५. शैव व वैष्णव | ५३ |

# मनोगत

कोणताही योगमार्ग असो वा देवतेचे उपासनाशास्त्र असो, अध्यात्मातील कोणत्याही विषयाचा मनापासून अभ्यास करू लागल्यास त्या विषयातील गोडी वाढते. यातूनच जिज्ञासा निर्माण होते. जिज्ञासू व साधक यांची आध्यात्मिक तृष्णा शमण्यासाठी त्यांना त्या त्या विषयातील पुढच्या पुढच्या स्तराचे ज्ञान मिळणे आवश्यक असते. हे ज्ञान त्यांची अध्यात्मपथावरील वाटचाल दृढ होण्यासाठीही उपयुक्त ठरते. हा उद्देश ध्यानी ठेवून शिवभक्तांसाठी प्रस्तुत लघुग्रंथ 'शिव - भाग २ (माध्यमिक स्तरावरील अध्यात्मशास्त्र)' सादर केला आहे. शिवाची काही वैशिष्ट्ये, रूपे, मूर्तीविज्ञान, संप्रदाय इत्यादींचा ऊहापोह या लघुग्रंथात केला आहे.

शिवाच्या विविध नावांचा अर्थ, शिवाची वैशिष्ट्ये व कार्ये, शिवाच्या उपासनेमागील अध्यात्मशास्त्र इत्यादी मुद्दे स्पष्ट करणारी व समजण्यास सोपी अशी माहिती 'शिव - भाग १ (प्राथमिक स्तरावरील अध्यात्मशास्त्र)' या ग्रंथात दिली आहे. त्या माहितीमुळे प्राथमिक टप्प्याच्या साधकाची पुढच्या टप्प्यात जाण्याच्या दृष्टीने वाटचाल होण्यास मदत होते.

सनातनच्या साधकांना साक्षात ईश्वराकडून विविध विषयांवर ज्ञान प्राप्त होत आहे. (अधिक माहिती पृष्ठ क्र. ६१ वर दिली आहे.) शिवासंबंधी मिळालेले दुर्मिळ ज्ञान, ज्ञानाच्या स्तरानुसार 'शिव -भाग ३ (पदवीपूर्व स्तरावरील अध्यात्मशास्त्र)' व 'शिव - भाग ४ (पदव्युत्तर स्तरावरील अध्यात्म-शास्त्र)' यांत दिले आहे. हे ज्ञान अध्यात्मशास्त्राचे अधिक सखोल व सूक्ष्म-स्तरावर विवेचन करते.

प्रस्तुत लघुग्रंथातील ज्ञानाचा उपयोग वाचकांनी केवळ पांडित्य निर्माण होण्यासाठी न करता, स्वतःची साधना वृद्धींगत करून ईश्वरप्राप्ती करण्यासाठी करावा, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना.

- **संकलक**